## <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५०७/२०२२ मधील आदेश नि.क्र.३०</u>

**(CNR No. MHSO130006202022)**

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत विना उलटतपास आदेश रद्दबातल करण्यात यावे याबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादी हे त्यांच्या शेतातील सुगीचे काम चालू असलेने त्याने गैरहजेरीचा अर्ज दिला होता. न्यायालयाने रु. ३००/– खर्चासह तो अर्ज मंजूर केला. परंतु तारखेच्या गैरसमजामुळे नेमलेल्या तारखेस प्रतिवादी उपस्थित राहून कॉस्टची रककम भरु शकला नाही. म्हणून न्यायालयाने दिनांक १०/११/२०२५ रोजी प्रतिवादीचे विरुद्ध उलटतपास नाही असा आदेश पारित केला. प्रतिवादीच्या झालेल्या चुकीची माफी होवून प्रतिवादी आदेशाप्रमाणे कॉस्टची रक्कम भरणेस तयार आहे. तरी त्याचा स्विकार करण्यात यावा. प्रतिवादी हे वादीचा उलटतपास घेणेस तयार आहेत. तरी प्रतिवादीला वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळावी. तसे न झाल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीने सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. वादीने प्रतिवादीच्या अर्जास हरकत नोंदविली व प्रतिवादीने अर्जात नमूद केलेला मजकूर खरा व कायदेशीर नाही. दिनांक ०३/१०/२०२५ रोजी ३००/– रुपये कॉस्टचा हुकूम झाला आहे. सदरची कॉस्ट दिली नाही म्हणून दिनांक १०/११/२०२५ रोजी प्रतिवादीने मुदतीचा अर्ज दिला नाही. प्रतिवादी प्रकरण लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करीत आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. वादी प्रकाश सुभाष गुजरे यांनी त्याच्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. २१ अन्वये दिनांक २१/०२/२०२५ रोजी दाखल केल्याचे दिसते. प्रतिवादीने नि.क्र. २९ अन्वये उलटतपासाकामी मुदत मागितल्याचा अर्ज कॉस्ट रु. ३००/– देण्याचे अटीवर मंजूर करण्यात आला. प्रतिवादींनी सदरची कॉस्ट न भरल्याने व उलटतपास न घेतल्याने प्रतिवादी विरुध्द दिनांक १०/११/२०२५ रोजी विना उलटतपास आदेश पारीत करण्यात आला होता. परंतु सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने वादी यांना

उलटतपासाची संधी देणे गरजेचे आहे. वादी यांना उलटतपासासाठी संधी न दिल्यास त्यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व वादीस उलटतपासाची संधी दिल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. वादीने अर्जामध्ये नमूद केलेले कारण ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. तसेच प्रतिवादीचा गेलेला वेळ हा खर्चाची रक्कम देऊन भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

**आ दे श**

१. प्रतिवादी यांनी पुर्वीची कॉस्ट रक्कम रुपये ३००/– अधिक प्रस्तुत अर्जावरील कॉस्ट रक्कम रुपये रु.३००/– असे एकुण रक्कम रुपये ६००/– वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी वादीस खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी विरुद्ध पारित विना उलटतपास आदेश रद्दबातल होईल.

३. प्रतिवादीने खर्चाची रक्कम प्रतिवादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी व पुढे विलंब न करता पुढील तारखेस वादीचा उलटतपासा घ्यावा.

सही/–

(श्रीमती रेवती पी. बागडे)

दिनांकः– २१/०१/२०२६ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. Revati P. Bagade, 4th Jt. Civil Judge, J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 21/01/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 22/01/2026 |